गुरुदास नूलकर



# सामाजिक कुंपणाची ऐशीतैशी

**सार्वजनिक साधनसंपत्तीचा तुटवडा ही आजच्या घडीला आपल्यासमोरची सर्वांत मोठी समस्या आहे. त्यामागची कारणं समजून घेण्याचा हा प्रयत्न.**

▶ सायन्स' मासिकात १९६८ साली 'ट्रॅजेडी ऑफ कॉमन्स' नावाने एक लेख प्रकाशित झाला होता. लेखक होते कॅलिफोर्निया विद्यापीठाचे ह्युमन इकॉलॉजीचे प्राध्यापक गॅरेट हार्डिन. या लेखाने अर्थशास्त्र व समाजशास्त्रातील विचारवंतांमध्ये खळबळ माजवली. हार्डिन यांनी या लेखात सार्वजनिक संसाधनांचा अनियंत्रित वापर व त्याचे परिणाम याची मीमांसा केली होती. त्याची सोप्या भाषेत मांडणी करण्यासाठी त्यांनी सार्वजनिक गायरानावर होणाऱ्या चराईचं उदाहरण घेतलं. जोपर्यंत गावातली गुरं व लोकसंख्येवर नियंत्रण असेल तोपर्यंत गायरानाचा उपभोग गावातील सर्व गुराख्यांना व्यवस्थित घेता येईल; परंतु जेव्हा हे नियंत्रण जाईल व गावात सामाजिक स्थैर्य येईल तेव्हा प्रत्येक गुराखी आपला वैयक्तिक फायदा साधण्याचा प्रयत्न करेल. गुराख्याने स्वतःच्या गुरांची संख्या वाढवली तर त्याचा फायदा त्याला एकट्यालाच होईल, परंतु गायरानाच्या अधिक चराईचा तोटा मात्र सर्वांमध्ये विभागला जाईल. हार्डिन म्हणतात, की प्रत्येक बुद्धिनिष्ठ गुराखी असा विचार करेल व कालांतराने गायरान निकृष्ट होईल. गुरांची संख्या वाढवण्यापासून गावकऱ्यांना परावृत्त करता येणार नाही व गायरानाचा विनाश अटळ असेल. सार्वजनिक संसाधनांची मालकी कोणाचीच नसल्यामुळे त्याचा उपभोग घेण्याची अथवा प्रदूषित करण्याची किंमत कोणालाच मोजावी लागत नाही. त्यामुळे वैयक्तिक फायद्याच्या शर्यतीत संसाधनांचा विनाश अपरिहार्य असेल.'' या पर्यावसानाला हार्डिन यांनी 'ट्रॅजेडी ऑफ कॉमन्स' (सार्वजनिक संसाधनांची शोकांतिका) असं संबोधित केलं.

सार्वजनिक संसाधनांच्या वापरावर नियंत्रण शक्य नाही, असंही विधान त्यांनी मांडलं व त्यावर खासगीकरण हा तोडगा सुचवला. या लेखात मांडलेली विधानं कळण्यासारखी होती, परंतु ती स्वीकारणं मानवी बुद्धिमत्तेला सोपं नव्हतं. अनेक संशोधकांच्या मते हार्डिन यांनी चुकीची उदाहरणं घेऊन विधानं मांडली होती, तर काहींनी हार्डिन डावे पंथी असल्याची टीका केली. (पुढे अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कारविजेत्या एलिनोर ओसट्रोम यांनी 'कॉमन पूल रिसोर्सेस' (उपभोक्त्याचा मालकी हक्क नसलेली सार्वजनिक संसाधनं) यावर महत्त्वाचं काम केलं व त्याचं व्यवस्थापन होऊ शकतं हे दाखवलं. त्यांनी कॉमन पूल रिसोर्सेसची नेमकी व्याख्या केली आणि त्यांच्या योग्य व्यवस्थापनासाठी आठ तत्त्वं मांडली.

गॅरेट हार्डिनच्या लेखामधील वादाचा भाग बाजूला ठेवला आणि 'कॉमन्स'चा अर्थ व्यापक केला तर सार्वजनिक संसाधनांची शोकांतिका वर्तमानकाळासाठीही रूपकात्मक आहे. दैनंदिन जीवनात 'कॉमन्स' म्हणजे हवा, पाणी, नैसर्गिक व मानवनिर्मित सार्वजनिक संसाधनं. या सर्वांचा योग्य व समान वापर होण्यासाठी कायदे आहेत, परंतु अनेक परिस्थितींत ते अपुरे पडतात. त्यामुळे त्यांचा गैरवापर करून घेता येतो. शिवाय प्रचंड लोकसंख्येमुळे

कायद्यांची अंमलबजावणी कठीण जाते. याचा फायदा काही लोक घेताना आपण नेहमीच अनुभवतो. याची काही उदाहरणं पाहू.

**आजची शोकांतिका**

आपल्या देशात मासेमारीसाठी मत्स्यव्यवसाय खात्याचे नियम आहेत, परंतु कोणी किती मासे पकडावे यावर निर्बंध नाहीत. आधुनिक तंत्रज्ञानाची जहाजं व जाळी वापरून मोठ्या संख्येने समुद्रात मासेमारी होते. त्यात माशांची पिल्लंही सापडतात. त्यामुळे हळूहळू माशांची संख्या कमी कमी होत जाते. भारताच्या किनाऱ्याजवळ परदेशी कंपन्यांची जहाजं अशा पद्धतीने मोठ्या प्रमाणात मासेमारी करतात. यामुळे छोट्या बोटी व रापण लावणाऱ्या कोळ्यांच्या हाती कमी प्रतीचे व कमी संख्येने मासे लागतात. जगातील कित्येक मत्स्यसाठे अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळी ठरले आहेत.

सार्वजनिक पाणीसाठ्याची अशीच व्यथा आहे. अनियंत्रित पाणी उपशाने काहींचा फायदा व गावाचा तोटा होतो. ऊसशेतीत जास्त पैसा आहे, पण त्यासाठी भरमसाठ  पाणी लागतं. या तुलनेत इतर पिकं घेणारे शेतकरी कमी पाणी वापरतात. ऊसशेतीमुळे पाणी अपुरं पडतं आणि काहींच्या फायद्यासाठी सर्व गावाला त्याचे परिणाम भोगावे लागतात.

शहरातील सार्वजनिक संसाधनांची परिस्थिती काही वेगळी नाही. शहरात प्रत्येकाला स्वतःच्या गाडीने प्रवास करावासा वाटतो. कोणी किती गाड्या घ्याव्या यावर काही मर्यादा नाही, त्यामुळे त्यांची संख्या दररोज वाढत आहे. मर्यादित रुंदीचे रस्ते व गाड्यांच्या वाढत्या गर्दीमुळे वाहतुकीचा त्रास सर्वांनाच सोसावा लागतो. रस्त्यांवरचे पादचारी मार्ग जाऊन चालण्याच्या जागी पार्किंग केलं जातं. त्यामुळे आबालवृद्धांना रस्त्यावर चालणं अवघड होतं. रहदारीत व प्रदूषणात पादचाऱ्यांचा अत्यल्प हातभार असला तरी त्यांना तितक्याच त्रासाला तोंड द्यावं लागतं.

जागतिक पातळीवरही या शोकांतिकेचा अनुभव येतो. पृथ्वीच्या पोटातील जीवाश्म, इंधनं व नैसर्गिक संसाधनं खरं तर सार्वजनिक आहेत, पण विकसित देशांतील जीवनशैली पोसायला भरमसाट ऊर्जा व नैसर्गिक संसाधनं खर्ची पडतात. त्यामुळे सर्वाधिक साठा प्रगत देशांकडे वळवला जातो. अशा जीवनशैलीतून सर्वाधिक ग्रीनहाऊस वायू तयार होतात आणि हवा, पाणी व माती या सार्वजनिक संसाधनांचं मोठ्या प्रमाणात प्रदूषण होतं.

> What is common to many is least taken care of, for all men have greater regard for what is their own than what they possess in common with others
> **— Aristotle**

उद्योगीकरणामुळे होणारा हवामानातील बदल सर्व देशांना जाणवतो. काहींना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. म्यानमार व तिबेट हे जगातील सर्वांत कमी प्रदूषण करणाऱ्या देशांपैकी आहेत; पण बदललेल्या हवामानामुळे समुद्रपातळीची होणारी वाढ म्यानमारला सर्वांत घातक ठरणार आहे, तर तिबेटमध्ये वेगाने वितळणारा बर्फ म्हणजे स्थानिकांना भेडसावणारी मोठी समस्या होऊन बसली आहे. या दोन देशांपेक्षा कित्येक पट जास्त ग्रीनहाऊस वायुनिर्मिती करणाऱ्या अमेरिकेला त्यामानाने कमी फटका बसणार आहे.

युनायटेड नेशन्सच्या २०१२ सालच्या रिओ+२० संमेलनात विकसित देश 'बिझनेस ॲज युज्वल'वरून मागे हटले नाहीतच, शिवाय या संमेलनाची निष्पत्ती ठरलेल्या'द फ्युचर वी वॉन्ट' या दस्तऐवजातून काही महत्त्वाचे बांधिल मुद्दे गाळले गेले. नोव्हेंबर २०१५ मध्ये पॅरिसच्या'सीओपी–२१ क्लायमेट चेंज' संमेलनात काही फार वेगळं घडलेलं नाही.

**सामाजिक कुंपण आणि सामूहिक व्यवस्थापन**

या सर्व उदाहरणांत नियमभंग न होता सार्वजनिक संसाधनांचा गैरवापर होत राहतो. हीच वर्तमानकाळातील शोकांतिका आहे. हार्डिन यांच्या मते कल्याणकारी शासनधोरणात अशा गोष्टी अपरिहार्य आहेत व यावर तांत्रिक उपाय नाही. हे टाळायचं तर नीतिमूल्यं व सार्वजनिक आचरण बदलणं हा मार्ग असू शकतो. आपल्या देशात पूर्वापार 'सोशल फेन्सिंग' म्हणजे सामाजिक नियमन किंवा कुंपण घालून संसाधनांच्या वापराचं सामूहिक व्यवस्थापन केलं जातं. यात वैयक्तिक फायद्यापेक्षा सार्वजनिक हिताला महत्त्व असतं. जे आचार तत्काळ अथवा भविष्यात अयोग्य ठरू शकतील त्यांच्या बाबतीत हिंदू स्मृतिग्रंथात 'इष्टं धर्मेण योजयेत', म्हणजे आचाराची सांगड धर्माशी घालावी असं सुचवलं जातं. याच्या आधारे सामूहिक व्यवस्थापन पद्धती यशस्वी झालेल्या दिसतात. अलिखित नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांना समाजात लांच्छनास्पद वागणूक दिली जाई.

आजही भारतात थोड्या प्रमाणात सामाजिक नियमन व सामूहिक व्यवस्थापनाचा प्रयोग होताना दिसतो. कित्येक गावांच्या वनसंपत्तीचं संरक्षण व पाणलोट क्षेत्रातल्या चराईवर नियंत्रण ठेवलं जातं. वनातील उत्पन्न कोणी व किती घ्यायचं हा निर्णय सामूहिकरीत्या घेतला जातो.

हरियाणातील सुखोमाजरी गावाने १९७० च्या सुमारास यशस्वीरीत्या गावच्या सार्वजनिक गवताळ क्षेत्राचं संरक्षण केलं व त्यावरील उत्पादनाचं व्यवस्थापन केलं. हिमालयात अशा प्रथा आजही आढळतात. वठायला आलेला देवदार वृक्ष कोणत्या कुटुंबाला मिळणार याचा निर्णय गाव घेतं. मग ते कुटुंब त्यातून घराची डागडुजी अथवा इतर वापर करून घेतं. महाराष्ट्रात तर अनेक यशस्वी उदाहरणं आहेत. गडचिरोलीतील मेंढालेखा गावात वनोत्पादनाचं सामूहिक व्यवस्थापन केलं गेलं, ज्याने सर्व गावाचं उत्पन्न आज वाढलेलं आहे. हिवरेबाजारमध्ये चराईवर नियंत्रण आणि पाणलोट क्षेत्राचं व्यवस्थापन केलं गेलं. धुळे जिल्ह्यातील लामकाणी गावातल्या गवताळ कुरणांचं नियमन करून त्यावरील उत्पादन यशस्वीपणे वाढवलं गेलं. वनविभागानेही स्थानिक लोकांना बरोबर घेऊन वृक्षतोड व जनावरांची हत्या रोखण्यासाठी याचा वापर केला आहे. पेरियार व्याघ्रक्षेत्राला नुकताच युनायटेड नेशन्सचा उत्कृष्ट व्यवस्थापनाचा पुरस्कार मिळाला. तिथे वनविभागाने सामाजिक कुंपणव्यवस्थेचा वापर केला आहे. विशेष म्हणजे तिथल्या व्यवस्थापनात स्त्रियांचं मोठं योगदान आहे. या उपक्रमात त्यांना वसंतसेना असं संबोधित केलं आहे.

भारतात मत्स्यव्यवसायातही सामाजिक कुंपण व सामूहिक व्यवस्थापनाचा प्रयोग केला जातो. समुद्रातील संपत्तीचा उपभोग संयमाने करण्यातच सर्वांचं हित आहे हे मच्छीमारांना ज्ञात आहे. त्यामुळे मत्स्यपैदास काळात मासेमारी नियंत्रित असते. जाळं ठराविक आकारापेक्षा मोठं असतं, ज्यामुळे त्यात पिल्लं पकडली जात नाहीत. रापण पद्धतीत आळीपाळीने मासेमारी केली जाते. असे अनेक निर्बंध सामूहिक पद्धतीने राबवले जातात व माशांची संख्या सांभाळली जाते. समुद्रसंपत्तीवर उपजीविका असलेले मच्छीमार हे नियोजन वर्षानुवर्षं करत आलेले आहेत. अनेक संशोधकांच्या मते असे अलिखित कायदेकानून व निर्बंध असणं हे एक प्रगल्भ समाजाचं लक्षण आहे.

वर्तमान साधनसंपत्तीची दुर्दशा– काही कारणं

आजच्या काळात बहुतांश सार्वजनिक संसाधनांचा स्वैर वापर होतानाच दिसतो. कोणी संयम पाळेल अथवा सामूहिक निर्बंध मानेल असं चित्र दिसत नाही. विशेषतः वाढत्या शहरीकरणात व उपभोगी जीवनशैलीत अशा पद्धती कालबाह्य होत चालल्या आहेत. याची मुख्यतः चार कारणं आहेत. पहिलं कारण लोकसंख्या. मानवी सदसद्विवेकबुद्धी म्हणजे सामूहिक व्यवस्थापनाचा गाभा आहे. सामूहिक संसाधनांचं व्यवस्थापन व योग्य वापर होण्यासाठी लोकसंख्या मर्यादित हवी. अल्पसंख्येत संघटित भावना प्रेरित करणं शक्य होतं, परंतु लोकसंख्या वाढली की ते अवघड होत जातं. आजच्या परिस्थितीत शहरं इतकी वाढली आहेत की इथल्या गर्दीत अनोळखीपणाने सर्रास वावरता येतं. जिथे आपल्याला कोणी ओळखत नाही तिथे सामाजिक अवहेलना प्रतिबंधक ठरत नाही. स्टॅन्फर्ड विद्यापीठाचे पॉल एहर्लिश म्हणतात– 'जगातील कोणतीही भयंकर समस्या सोडवायला आधी लोकसंख्या कमी करणं भाग आहे.'

दुसरं कारण आहे समाजातील वाढती आर्थिक विषमता. शहरात पैसे कमावण्याचे अनेक मार्ग असतात. त्यामुळे वैयक्तिक आकांक्षा व व्यावसायिक उद्दिष्टं भिन्न होत जातात, सामाजिक संलग्नता कमी होते व सामूहिक व्यवस्थापन कमकुवत होतं. शहरात अनेक आर्थिक स्तर असले तरी सार्वजनिक संसाधनं सर्वांसाठी सारखीच असतात. झोपडपट्टीतील रहिवासी असो वा बंगलेवाले– तेच रस्ते व तोच पाणीपुरवठा. अशा परिस्थितीत संसाधनांचा योग्य व समान वापर क्लिष्ट होतो. हमरस्त्यात हातगाडी लावायला बंदी घालायची व मोठाल्या गाड्यांसाठी पार्किंग अड्डे बनवायचे, हे कोणाला तरी अन्यायकारक होणारच. त्यामानाने छोट्या खेड्यात आर्थिक समता अधिक असते व सामाजिक निर्बंध प्रभावी होऊ शकतात.



**पर्यावरणीय व्यवस्थापनातील तज्ज्ञ गुरुदास नूलकर इकॉलॉजिकल सोसायटीचे विश्वस्त आहेत. सिंबायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट इथे ते प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.**

सामाजिक कुंपण व व्यवस्थापन पद्धत यशस्वी होण्यासाठी संसाधनांच्या लाभार्थींनीच त्यांचं व्यवस्थापन करायला हवं; परंतु वर्तमानकाळात या पद्धतींचे व्यवस्थापक समाजाबाहेरचेच असतात. त्यातून साधनसंपत्ती निर्यात करण्यास प्रोत्साहन दिलं जातं. सार्वजनिक नियोजन अयशस्वी होण्याचं हे तिसरं कारण. इंग्रज सरकारने स्थानिक लोकांना डावलून वनसंपत्तीचं व्यवस्थापन हातात घेतलं आणि उत्तम प्रतीचं लाकूड त्यांनी स्वतःच्या नौदलासाठी वापरलं. यामुळे वनसंरक्षणाचं स्वरूपच बदलून गेलं. गावाची संपत्ती इतरत्र जाताना दिसल्यावर आपल्या हाती काही तरी लागावं असं गावकऱ्यांना साहजिकच वाटलं असेल. त्यामुळे सामाजिक नियमन कोलमडलं. हीच गोष्ट मासेमारी व्यवसायात

झाली. सरकारने मासेनिर्यातीला प्रोत्साहन देऊन परदेशी कंपन्यांना मासेमारीची परवानगी दिली. त्यांचं मासेमारीचं आधुनिक तंत्रज्ञान समुद्राला जणू नांगरून काढतं. ते बारमाही मासेमारी करतात. त्यामुळे माशांचं वैविध्य कमी होऊन स्थानिक लोकांचं उत्पन्न कमी झालं आहे. आपापसातच निर्बंध घालून हाती काहीच लागणार नाही, हे लक्षात आल्यावर मच्छीमारांचं पारंपरिक व्यवस्थापन कमी होत गेलं.

चौथं कारण म्हणजे आज समाजात स्पर्धा व महत्त्वाकांक्षा यांचा होणारा पुरस्कार. घरातच स्पर्धा सुरू होते व शालेय शिक्षणात ती पोसली जाते. विविध माध्यमांतून याचा गौरव होत असतो. परंतु नैसर्गिक संसाधनं मर्यादित व सार्वजनिक आहेत; त्यांचा वापर संयमाने होणं आवश्यक आहे, हे कधीच चर्चेत येत नाही. स्पर्धा व महत्त्वाकांक्षा यांत काही वैगुण्यंही आहेत याचा विसर पडतो, जो आज घातक ठरतो आहे.

वरील कारणांमुळे वाढत्या शहरांत सार्वजनिक निर्बंध व व्यवस्थापन पद्धती कोलमडतात. त्यामुळे शहरं कायदाव्यवस्थेवरच अवलंबून राहतात. त्याचबरोबर सरकारचं कल्याणकारी धोरणही याला मारक ठरतं. लोकशाहीत आचरणावर निर्बंध लावणं म्हणजे काही मतदारांचा रोष ओढून घेणं. आपल्या सत्तेच्या कालावधीत कोणाला दुखावण्यापेक्षा सर्वांना लाभ घेऊ देणं कोणत्याही सरकारला सोयीस्कर असतं. 'कोलॅप्स' या पुस्तकात कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक जेरेड डायमंड यांनी पुरातन काळातील प्रगत समाज का नष्ट झाले यावर संशोधन केलं आहे. त्यांनी ग्रीनलंडची नॉर्स जमात, ईस्टर बेटावरील रहिवासी, मध्य अमेरिकेची माया संस्कृती यांसारखी अनेक उदाहरणं घेऊन विश्लेषण केलं आहे. या सर्व समाजांत सांस्कृतिक व सामाजिक बंधनं डावलली गेली व नजीकचा फायदा गाठताना दूरच्या परिणामांकडे दुर्लक्ष होत गेलं. आपल्या संस्कृतीची आजची परिस्थिती काहीशी अशीच आहे. आधुनिक जीवनशैलीचा उपभोग घेताना निसर्गाचा होणारा ऱ्हास आपल्याला कधीच जाणवला नाही, पण 'क्लायमेट चेंज' नावाचा भस्मासूर आपण यातूनच घडवत गेलो.

मग या सार्वजनिक संसाधनांच्या या शोकांतिकेतून बचाव करायचा कसा? याला उपाय काय असू शकतील? सार्वजनिक साधनसंपत्तीचा संयमी व योग्य वापर होण्यास सर्व लाभार्थींना प्रयत्न करावा लागेल. त्यासाठी तीन स्तरांवर बदल करावे लागतील. सर्वप्रथम वैयक्तिक स्तरावरचे बदल. यात प्रत्येक नागरिकास सार्वजनिक संसाधनांचा उपभोग घेताना संयम पाळणं आवश्यक आहे. स्वतःचा फायदा व भवितव्यातील सर्वांचं हित यात तडजोड करणं आवश्यक आहे. आजच्या भाषेत याला 'इंडिव्हिज्युअल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी'(समाजाची वैयक्तिक जबाबदारी) असं म्हणता येईल.

दुसऱ्या स्तरावर सामाजिक आचरणातले बदल आवश्यक आहेत. समाजातील सर्वांना सार्वजनिक हिताची जाणीव असणं अत्यावश्यक आहे. हे घरातील संस्कारातून व शालेय शिक्षणातून आलं पाहिजे. आजच्या शिक्षणपद्धतीत स्पर्धात्मक व महत्वाकांक्षी कारकिर्दीची मशागत करून घेतली जाते व सामूहिक हिताकडे दुर्लक्ष होतं. ही तफावत दूर होणं महत्त्वाचं आहे.

तिसरा स्तर म्हणजे बाह्यशक्तीचा वापर अर्थात कायद्याचा आधार. यात मोठी भूमिका सरकारची आहे. परंतु न्यायप्रणाली कितीही व्यापक असली तरी त्याला पूरक अंमलबजावणीची गरज असते. भारतात नेमकी याची उणीव भासते व समाजात असंतोष पसरतो. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सरकारी हस्तक्षेप पूरक होणं दिवसेंदिवस कठीण होत जाणार या शंकाच नाही. म्हणूनच कायद्याचं पालन अनिवार्य आहे, ही भावना समाजातील प्रत्येकाकडे असणं गरजेचं आहे.

अशा प्रकारचा त्रिस्तरीय बदल कदाचित आपल्या पिढीला झेपणार नाही, परंतु या समस्येची जाणीव तरी नक्कीच करून घेता येईल. आज हा विचार शिक्षणात आणणं गरजेचं आहे, जेणेकरून पुढच्या पिढ्यांसाठी या गोष्टी सुलभ होतील. वैयक्तिक फायदा व सामूहिक हित यातील संघर्ष आज दुर्लक्षित आहे; पण त्यामुळे सर्वांवर अवकळा येऊ शकते, हे उमगणं आवश्यक आहे.

आजच्या परिस्थितीत सार्वजनिक संसाधनांची शोकांतिका अटळ नक्कीच नाही, पण ती टाळणं सोपंही नाही. भारताच्या इतिहासात अनेक वेळा पुरोगामी विचारसरणीने प्रवेश केला असल्याचं दिसतं. त्याआधारे पुढील पिढीसाठी ही आशा मनात बाळगण्यास हरकत नाही.

**▪ गुरुदास नूलकर**
९८२२०३४५७९
gurudasn@gmail.com

**(या लेखावरील वाचकांच्या मतमतांतरांचं स्वागत आहे.)**

## परिस्थितीवर मात करत आपलं अन् इतरांचंही आयुष्य घडवणाऱ्या दोन प्रेरक कहाण्या

# गोष्ट गुरुजी घडण्याची

**प्रल्हाद काठोले**





ही गोष्ट आहे परिस्थितीशी झुंजत परिस्थितीशी झुंजत शिक्षक झालेल्या एका तरुणाची. नोकरीत पाट्या टाकण्याऐवजी मिळालेल्या मार्गदर्शनाचं बोट धरत तो नवे प्रयोग करण्यावर भर देतो. यंत्रणेतल्या चाकोरीला दोष देत बसण्यापेक्षा स्वतः सक्रिय होऊन अर्थपूर्ण शिक्षणाच्या वाटा धुंडाळतो. मुलांसोबत स्वतःलाही घडवतो.
मनाशी ठरवलं तर प्रत्येकाला आपलं आयुष्य असं घडवता येऊ शकतं हे सांगणारी एका प्रयोगशील गुरुजीच्या घडण्याची गोष्ट.

**पाने १३६ । किंमत १५० रु.**

---

# जनसेवे जीवन दिधले

**अभिमन्यू सूर्यवंशी**




सोलापूर जिल्ह्यातल्या एका छोट्या खेड्यातून एक तरुण मुलगा पोटापाण्याच्या शोधात शहरात येतो. स्थैर्य मिळाल्यावर त्यातच समाधान न मानता स्वतःला सार्वजनिक कामात झोकून देतो. हा तरुण म्हणजे उत्तमराव पाटील.
बहुजनांच्या शिक्षणासाठी उत्तमराव समाजकारणाकडे वळले. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेसह अनेक संस्थांसाठी ते अविरत झिजले. निरलस वृत्तीने जनसेवेसाठी आयुष्य झिजवलेल्या एका सच्च्या कार्यकर्त्याची कहाणी.

**पाने ११२ । किंमत १५० रु.**

---

समकालीन प्रकाशन

८ अमित कॉम्प्लेक्स, ४७४ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११०३०.
पुणे संपर्क : ०२०.२४४७०८९६. मुंबई संपर्क : ०२२.२४३११३९८.